# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.04.2026** **वार: मंगळवार**

1. देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची केंद्र सरकारची माहिती
2. राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा; काळाबाजार रोखण्यासाठी राज्यभर दक्षता पथकं
3. बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्जाची आज छाननी आणि
4. बुलढाणा जिल्ह्यातल्या जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरात आज 'योग महोत्सवा'चं आयोजन

**<u>पत्रकार परिषद</u>**

देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं काल केंद्र सरकारतर्फे सांगण्यात आलं. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सरकारनं ही माहिती दिली. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर असून सरकार पुरवठा आणि दर यावर देखरेख ठेवत असल्याचं ग्राहक व्यवहार विभागाचे अतिरिक्त सचिव अनुपम मिश्रा यांनी यावेळी सांगितलं. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या सहसचिव सी. शिखा यांनी सांगितलं की देशात सुमारे 602 लाख मेट्रीक टन अन्नधान्य साठा उपलब्ध आहे. एलपीजी घेऊन येणारी ग्रीन सानवी आणि ग्रीन आशा ही दोन भारतीय निशाणधारी जहाजं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितरित्या बाहेर पडली असल्याची माहिती बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी दिली. आखाती समुद्रातील भारतीय जहाजं, खलाशी सुरक्षित असून परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा केल्याचं मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

**<u>राज्य-पेट्रोलियम</u>**

राज्यात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी काल दिली. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे, माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह, 'पीआयबी'च्या महासंचालक स्मिता वत्स-शर्मा, यांच्यासह अन्य वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या 25 लाखांपेक्षा जास्त झाली असून एका महिन्यात 73 हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या असल्याचं डिग्गीकर यांनी सांगितलं. राज्यात घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून दररोज साधारण 5 लाखाहून अधिक सिलिंडर वितरित केले जात आहेत. यात रुग्णालयं, शैक्षणिक संस्था इत्यादींना प्राधान्य दिलं जात असून स्थलांतरित मजूरांना 5 किलोचे सिलिंडर पुरवण्यात येत आहेत. वितरण पारदर्शक करण्यासाठी Delivery Authentication Code सक्तीचा करण्यात आला आहे, अशी माहिती चंद्रकांत डांगे यांनी दिली.

घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यभर दक्षता पथकं स्थापन करण्यात आली आहेत. 1 मार्च ते 6 एप्रिल दरम्यान 3 हजार 628 सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी 53 गुन्हे नोंदविण्यात आले असून 36 जणांना अटक करण्यात आली असल्याचं यावेळी सांगण्यात आलं. राज्यात खरीप हंगामाकरता खतांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्य स्तरावर नियोजन करण्यात आलं असल्याचं या पत्रकार परिषदेत सांगण्यात आलं.

**पोटनिवडणुक**

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. बारामतीत उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज दखल केला. तर महाआघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसतर्फे आकाश मोरे यांनीही काल उमेदवारी अर्ज दाखल केला. बारामतीची पोटनिवडणूक ही वैयक्तिक नसून अजित पवार यांच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाची असल्याची भावना सुनेत्रा पवार यांनी अर्ज दाखल करताना व्यक्त केली.

ही निवडणूक बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं. अजित पवार यांच्यासोबत काम केलेल्या काँग्रेस नेत्यांनी जनभावनेचा आदर करून ही निवडणूक बिनविरोध होऊ द्यावी असं आवाहन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी आमची अपेक्षा आहे, मात्र तरीही निवडणूक लढवण्याची वेळ आली तर मैदानात उतरून पूर्ण ताकदीने लढावं असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांनं देखील ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी पाठिंबा दिला आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एफआयआर दाखल केला तर बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठीच्या काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेता येईल, असं काँग्रेसनं स्पष्ट केलं आहे. निवडणुकीत राजकीय पक्षाने उमेदवार देणं यात काही चुकीचं नाही. तो त्यांचा निर्णय आणि राजकीय अधिकार आहे, त्यावर फार चर्चा करण्याचं कारण नाही, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली आहे. निवडणूक बिनविरोध घ्या अशी मागणी करण्याचंही काही कारण नाही. कारण लोकशाहीत तुम्हाला जेव्हा निवडणूक लढवायची असेल तेव्हा समोर कुणीतरी उमेदवार असेल, हे मान्य करूनच ती लढायला हवी, असंही ते म्हणाले.

दरम्यान राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपातर्फे अक्षय कर्डिले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे गोविंद मोकाटे यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली. त्यानंतर प्राजक्त तनपुरे निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. बारामती आणि राहुरी या दोन्ही ठिकाणी उमेदवारी अर्जांची छाननी आज होणार आहे. येत्या 9 तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येतील; 23 एप्रिल रोजी मतदान तर 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे.

**राज्यसभा**

राज्यातल्या 5 खासदारांसह राज्यसभेच्या 19 नवनियुक्त सदस्यांनी काल पदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह रामदास आठवले, ज्योती वाघमारे, माया इवनाते, रामराव वडकुटे यांना राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत खासदार पदाची शपथ देण्यात आली.

**भाजपा**

भारतीय जनता पक्षाचा 47वा स्थापना दिन काल साजरा करण्यात आला. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांना दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत शुभेच्छा दिल्या. समान नागरी कायदा आणि एक देश एक निवडणूक ही भाजपाची दोन कामं अद्याप अपूर्ण असून त्यासाठी मार्ग तयार करण्यात येत असल्याचं मोदी म्हणाले. भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांच्या हस्ते नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात ध्वजारोहण झालं. राज्यातील भाजपाच्या विविध कार्यालयांमध्येही काल ध्वजारोहण करण्यात आलं.

**योग महोत्सव-बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातल्या जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात आज 'योग महोत्सवा'चं आयोजन करण्यात आलं आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर 'उलटगणती' उपक्रमाचा भाग म्हणून साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवात सर्व शासकीय यंत्रणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा असं आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं.महोत्सवाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे 75 दिवस शिल्लक असताना योगाचा व्यापक प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशानं आयुष मंत्रालयानं हा महोत्सव आयोजित केला आहे. या कार्यक्रमात 7 हजारांहून अधिक योगसाधक सहभागी होतील अशी माहिती जाधव यांनी दिली.

**आरोग्य दिन-परभणी**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आज परभणी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक आरोग्य विभागानं संपूर्ण जिल्ह्यात विविध नाविन्यपूर्ण आरोग्य कार्यक्रम आणि जनजागृती मोहिमा आयोजित केल्या आहेत. यामध्ये आरोग्य शिबीर, आरोग्य प्रभात फेरी आणि आरोग्य दिंडी, चर्चासत्रं, जनजागृती कार्यक्रम, ग्रामपातळीवरील आरोग्य सभा, समुदाय आधारित गटचर्चा आणि समुपदेशन. यांचा समावेश आहे

**आंदोलन-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या प्रश्नांकडे जिल्हा परिषद प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी काल सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेनं धरणं आंदोलन केलं. जर या मागण्यांची दखल घेतली नाही, तर येत्या 13 एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण आणि धरणं आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष सावळाराम आणावकर यांनी दिला आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज हवामान कोरडं राहील तर, विदर्भात तुरळक ठिकाणी वादळी वारे आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.